## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ६६८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०९/२०१७

**१) घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन घरातील साहित्याची चोरी :—**

दिनांक ३०/०९/२०१७ चे १५.०० ते २५/०९/२०१७ चे ११.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी बाळकृष्ण सखाराम गजभिये वय ६२ वर्ष, रा. सावित्रीबाई फुले शाळे जवळ खोकरला रोड बेला हा आपले कुंटुबासह बाहेरगावी गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणाही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन २२ ईच सॅनसुई कंपनीची एलसीडी टि. व्ही किंमती १०,०००/—रु. भिंतीवर असलेली घडयाळ किंमती ५००/—रु, चांदीचे पुजेचे समान अंदाजे ०.५ किलो किंमती १०,०००/—रु. सिल्कच्या साडया ४ नग किंमती २५००/—रु. काचेचा सामान क्राॅकरी किंमती ५००/—रु, स्टिलीचे भांडे व २ नग कुकर किंमती ३०००/—रु. व नगदी ४१,०००/—रु. असा एकुण ६७,५००/—रु. चा माल चोरुन फिर्यादी याचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाळे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) घरातील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन नोटाचे बंडल, गळयातील दागीणे, सिसीटीव्ही कॅमेऱ्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २०/०९/२०१७ चे ०९.३० ते २२/०९/२०१७ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती नुतन विठ्ठल मलेवार वय ५९ वर्ष, रा. गांधी वार्ड तुमसर ही घराला ताला लावुन देव दर्शना करीता कोल्हापुर येथे गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणाही नसल्याची संधी साधुन चोरुन घराचे समोरील दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन घरातील बेडरुम मधील आलमारीत ठेवलेले १०/रु नोटाचे एकुण ८ बंडल ८०००/—रु. बेलटेक्सचे बनावटी बांगडया व गळयातील दागीणे अंदाजे किंमती १०,०००/—रु. सिसीटीव्ही कॅमेरा यांची डाटापेटी किंमती १२,०००/—रु. असा एकुण ३०,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. म्हसकर पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २५/०८/२०१७ ते आज पावेतो. यातील फिर्यादीची अल्पवयीन साळी ही मैत्रीनीकडे जाते म्हणुन घरुन निघुन गेली तिचा शोध घेतला असता मिळुन आली नाही सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३६३ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**४) टाटा सुमो चालकाने अवैध प्रवासी भरुन वाहन लापरवाहीने चालवुन शासकीय कामात अडथळा निर्माण करुन पोलीस शिपायास जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २४/०९/२०१७ चे १६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी राहुल रमेश गभणे वय २६ वर्ष रा. दिघोरी, जखमी पो. शि. आशिष ठोबरे ब. न. ११७१ पो. स्टे. दिघोरी हा आपले ट्राफीक डियुटीवर असुन वाहन पडताळणी कार्यवाही करीत असतांनी यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन वाहनात अवैद्यरित्या प्रवासी बसवुन वाहतुक करीत असतांना आरोपी वाहन चालकाने वाहन न थांबवीता जखमीस धडक मारुन जखमी केले तसेच पोलीसा कडुन तपास चुकविल्याने उद्येशाने सरकारी कर्मचाऱ्यावर हमला करुन शासकीय कामात अडथळा निर्माण करुन पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३३८,३५३ भांदवि. सहकलम ६६(१)/१९२,१३४,१८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पो.स्टे दिघोरी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) गळफास लावुन तरुणाचामृत्यु :—**

दिनांक २४/०९/२०१७ चे २३.०० वाजता दरम्यान यातील मृतक लखन रामभाऊ निर्वाण वय १८ वर्ष, रा. लाखनी हा स्वत:चे घरी छपरीत स्लॅपवरील सिलींग फॅनचे हुकाला दुपट्टा बांधुन गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**६) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :—**

दिनांक १४/०९/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान यातील मृतक रमेश सितारामजी प्रधान वय ५० वर्ष, रा. लाखांदुर हा धानावर फवारनी करीत असता बाजुला ठेवलेल्या पिण्याचे पाणी बकेट मध्ये होते बकेट मधील पाणी मृतकने पिल्याने प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भोगे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे लाखांदुर हे करीत आहेत.

**७) अवैध दारू /जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक २६/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. वरठी, सिहोरा व लाखांदुर येथे अवैध दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून २२ लिटर हा.भ. दारू किंमती १३२०/—रु, तसेच जुगारातुन किमती ६८७/रु असा एकुण किंमती २,००७/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २६/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०४ केसेस करण्यात आले आहे.

26.9

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता